www.rajdand.com
सातारा, रविवार
29.01.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ शु. ७
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

माणदेशी चॅम्पियनची कुस्तीपटू धनश्री फंड ठरली महिला केसरीची मानकरी

पान ४ वर..



# महावितरण ग्राहकांना देणार दरवाढीचा मोठा शॉक!

## महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे ३७ टक्के दरवाढीचा प्रस्ताव

**मुंबई : सर्वसामान्य नागरिकांना नवीन आर्थिक वर्षांपासून वीज दर वाढीचा शॉक बसण्याची शक्यता आहे. आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी 'महावितरण' कंपनीने आर्थिक भार वीज ग्राहकांवरच टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार आगामी वीजदर आढाव्यात तब्बल ३७ टक्के दरवाढीचा प्रस्ताव कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केला आहे. तर पुढील दोन वर्षासाठी सरासरी ही दरवाढ ३७ टक्के प्रस्तावित आहे. या प्रस्तावामुळे घरगुती, व्यावसायिक, शेतकरी अशा सर्वच श्रेणींना दरवाढीचा धक्का बसण्याची शक्यता आहे.**

महावितरण कंपन्यांचे ग्राहकांसाठीचे वीजदर पंचवार्षिक असतात. त्यानंतर या दरांचा मध्यकालीन आढावा घेतला जातो. सध्याचे दर एक एप्रिल २०२०पासून लागू झाले आहेत. त्यानुसार त्यांचा आता मध्यकालीन आढावा घेतला जात असून विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या प्रस्तावाला हिरवा कंदील दिल्यास या वर्षी एक एप्रिलपासून नवीन दर लागू होऊ शकतात.



या अंतर्गत 'महावितरण'ने भरमसाट दरवाढ प्रस्तावित केली आहे. या नवीन दरांनुसार, घरगुती ग्राहकांचा सध्या असलेला किमान दर ३.३६ रुपये प्रति युनिटवरून २०२३-२४ साठी (एक एप्रिलपासून) ४.५० रुपये प्रतियुनिट होऊ शकतात. तर सध्याचा ११.८६ रुपये प्रतियुनिट हा कमाल दर आता १६.६० रुपये प्रति युनिट प्रस्तावित आहे. या दोन्ही श्रेणींमधील सन २०२४-२५ साठीचा वीजदर अनुक्रमे ५.१० रुपये ते १८.७० रुपये प्रति युनिट प्रस्तावित आहे. त्यामुळे घरघुती ग्राहकांच्या चिंतेत भर पडली आहे.

व्यावसायिक श्रेणीतील ग्राहकांचा विचार केला तर सध्या असलेला किमान ७.०७ रुपये ते ९.६० रुपये प्रतियुनिटचा दर, आता १२.७६ रुपये ते १७.४० रुपये प्रति युनिट इतका प्रस्तवित आहे. त्यापुढील वर्षासाठी हा दर किमान ११ रुपये ते कमाल २० रुपये प्रति युनिट इतका प्रस्तावित आहे. लघुदाब औद्योगिक श्रेणीतील हा दर आता ५.११ रुपये ते ६.०५ रुपये प्रति युनिटवरून ६.९० ते ८.२० रुपये प्रति युनिट प्रस्तावित आहे. उच्चदाब औद्योगिक श्रेणीतील ग्राहकांना आता सध्याच्या ६.८९ रुपये प्रतियुनिटवरून ९.३२ व त्यानंतरच्या वर्षी १०.५० रुपये प्रति युनिट इतका असेल. लघु दाब श्रेणीतील शेतकऱ्यांसाठीचे दर देखील किमान १.९५ रुपये ते कमाल ३.२९ रुपये प्रति युनिटवरून २.७० रुपये ते ४.५० रुपये प्रति युनिट करण्याबाबत नमूद आहे. मात्र वीज दर वाढीचा महावितरणने फक्त प्रस्ताव दिला आहे. राज्य सरकारचा या दर वाढीशी कोणताही संबंध नसतो. हा निर्णय विद्युत नियामक आयोगाला घ्यायचा आहे. त्यामुळे महावितरणकडे आपला तोटा भरून काढण्यासाठी दर हा एकमेव पर्याय आहे. मात्र किती वीज दर वाढीला मंजुरी द्यायची की, नाही? हा आयोगाचा अंतिम निर्णय असेल.

# जीव वाचवण्यासाठी घेतल्या उड्डाणपुलावरून १४ हरणांनी उड्या

## सोलापुरातील दुर्दैवी घटना; सर्व हरणांचा मृत्यू

**सोलापूर** : सोलापुरातील उड्डाणपुलावरून आपला जीव वाचवण्यासाठी हरणांच्या कळपाने उड्या मारल्या. मात्र जीव वाचण्याऐवजी यावेळी हरणांचा जीव गेल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. वाहनाच्या कर्कश आवाजामुळे ही हरणे भेदरली होती. जीव वाचवण्यासाठी ही हरणे पळत सुटली आणि त्यांनी उड्डाणपुलावरून उड्या घेतल्या. या घटनेमुळे सोलापुरात हळहळ व्यक्त होत आहे.

आपला जीव वाचवण्यासाठी भेदरलेल्या हरणांनी उड्डाणपुलावरून उड्या मारल्या आणि त्यात जबर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. हा प्रकार शनिवारी सायंकाळच्या सुमारास सोलापुरात घडला आहे. नव्याने निर्माण झालेल्या केगाव ते विजापूर रोड या राष्ट्रीय महामार्गावर देशमुख वस्ती परिसरात ही घटना घडली आहे.

या घटनेबाबत प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, एक हरणांचा कळप उड्डाणपुलावरून खाली पडला आहे. ही घटना घडल्यानंतर घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेती माहिती मिळताच वन विभागाचे


फाईल फोटो

पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेत जवळपास १४ हरणांचा या घटनेत मृत्यू झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले.

या घटनेच्या अनुषंगाने वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. 'या भागातून नेहमीच हरणं आणि इतर प्राणी रस्ता ओलांडत असतात. वाहनांच्या आवाजाने घाबरून हरणांनी उड्डाणपुलावरून उड्या मारल्याची शक्यता वर्तवली आहे. घटनेच्या वेळी अचानक वाहन समोर आल्याने हरणाच्या कळपाने पुलावरून उडी मारली असेल आणि एकाच वेळी त्यांचा मृत्यू झाला असेल' असा अंदाज सोलापूर वन विभागाचे प्रमुख, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी वर्तवला आहे.

केगाव-विजापूर राष्ट्रीय महामार्ग बाह्यवळणावर देशमुख वस्तीनजीक उड्डाणपूल आहे. या भागात हरणांसह, काळवीट व इतर वन्य प्राण्यांच्या व कळपांचा नेहमीच वावर असतो. आसपासचा बहुतांशी परिसर सपाट आणि तुलनेत कमी वर्दळीचा आहे. हरीण व काळविटांचे कळप राष्ट्रीय महामार्गावर येतात आणि रस्ता ओलांडून पुढे जातात. रस्त्यावरील वाहनांमुळे भीतीने पुढे पळत असताना अपघात होतात. उड्डाणपुलावरून पुढे पळताना काळविटांचा कळप उड्डाणपुलावरून खाली कोसळतो आणि त्यांचे जीव जातात. असे प्रकार नेहमीच घडतात, असे केगाव परिसरातील ग्रामस्थांनी सांगितले.

# मोबाईल गेममुळे नागपुरात १२ वर्षीय मुलाचा गेला जीव

**नागपूर : वृत्तसंस्था**

मोबाईल ॲप पाहून तशीच कृती करण्याच्या प्रयत्नात आठवीत शिकत असलेल्या बारा वर्षीय विद्यार्थ्याला जीव गमवावा लागला. ही धक्कादायक घटना सोमवारी क्वॉर्टर परिसरात घडली. बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. अग्रण्य सचिन बारापात्रे (वय १२, सोमवारी क्वॉर्टर) असे गळफास घेतलेल्या मुलाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन सुरेश बारापात्रे (वय ४०) हे सोमवारी क्वॉर्टर परिसरात नानासाहेब राऊत यांच्या घरी भाड्याने राहतात. बुधवारी दुपारच्या सुमारास टेरेसवर अग्रण्य खेळायला गेला होता. दरम्यान, वडील काही कामानिमित्त बाहेर, तर आई घरकामात व्यस्त होती. काही वेळ अग्रण्यने पतंग उडविली. त्यानंतर तिथेच असलेल्या लाकडी शिडीवर तो आजूबाजूच्या नागरिकांना खेळताना दिसला. त्यानंतर टेरेसवर असलेल्या लाकडी शिडीला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत तो आढळला. ही माहिती त्यांनी घरमालक किशोर चिखले आणि अग्रण्यच्या आईला दिली. याची माहिती त्यांनी आईला दिली. त्यांनी अग्रण्यला खाली उतरविले. तसेच उपचारासाठी मेडिकल येथे घेऊन गेले असता, डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

अग्रण्यची आई गृहिणी असून, त्याचे वडील इलेक्ट्रिकचे काम करतात. पोलिसांच्या तपासात अग्रण्यला मोबालवर सतत खेळण्याची सवय होती, असे पुढे आले आहे. त्याने आईच्या मोबाइलमध्ये अनेक ॲप डाउनलोड केले होते. त्यापैकीच एका ॲपमध्ये गळ्यात दोर लटकवून तो कसा काढायचा याबाबतची माहिती तो सातत्याने बघत होता. त्यातूनच बुधवारी त्याने तसा प्रयत्न केल्याने त्यातून लागलेल्या गळफासात त्याचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले.

# पत्रकार इम्तियाज मुजावर यांना जीवे मारण्याची धमकी

## धमकी देणाऱ्यास तात्काळ अटक करावी - जावळी पत्रकार संघाची मागणी; मेढा पोलिसांना दिले निवेदन

**कुडाळ : प्रतिनिधी**

जावली तालुक्यातील पत्रकार इम्तियाज मुजावर यांना पोस्टाद्वारे पत्र पाठवून धमकी देण्यात आली आहे.. धमकी देणाऱ्या अज्ञात इसमाला तात्काळ शोधून अटक करावी व कडक कारवाई करावी अशी मागणी पत्रकार संघ जावळीचे अध्यक्ष पदाधिकारी व सदस्यांनी मेढा पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे केली आहे.

जावली तालुक्यातील दारू धंदे बंद करण्याच्या भानगडीत पडू नको जिवंत राहणार नाही, अशी धमकी देण्यात आली आहे. सर्व दारू व्यवसायिकांनी पोस्टाद्वारे ही धमकी पाठवली आहे. असे पत्र पाठवणाऱ्याचा शोध सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलिसांनी शोधून काढावा अशी मागणी देखील निवेदनात केली



आहे सदर जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या पत्राद्वारे व या पाठीमागे नेमकी कोण आहे याचा कसून शोध घ्यावा.

या घटनेचा पत्रकार संघ जावळीच्या सर्व सदस्यांनी सातारा पत्रकारांनी निषेध व्यक्त केला जात असून दारू व्यवसायिकांनी ही धमकी दिली असल्याने त्यांच्या विरोधामध्ये गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती या मागणीवर तात्काळ मेढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी अज्ञातावर गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे पत्रकार इम्तियाज मुजावर यांना त्यांच्या पत्त्यावर सर्व दारू व्यवसायिक असा उल्लेख करून आत मध्ये धमकीचा मजकूर लिहिण्यात आला आहे.

या घटनेबाबत पोलिसांनी तपास सुरू केलाय, असे अभिवचन देखील मेढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी दिले. यावेळी पत्रकार संघ जावळीचे अध्यक्ष वसीम शेख, उपाध्यक्ष संतोष बेलोशे, सचिव विनोद वेंदे यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंनिसच्या पदाधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरणाचे प्रयत्न; धमकीसत्र सुरूच

**मुंबई** : बागेश्वर धामचे महाराज पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांना दिव्यशक्ती दाखविण्याचे चॅलेंज दिले होते. त्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सहअध्यक्ष श्याम मानव यांना मिळालेल्या जीवे मारण्याच्या धमकीनंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यभरातील कार्यकर्त्यांचे फोनवर धमक्या देऊन, तसेच सोशल मीडियावर बदनामी करुन खच्चीकरणाचे प्रयत्न सुरु असल्याची बाब समोर आली आहे. मात्र आपण रोज धमकी देण्यासाठी येणाऱ्या फोनवर त्यांचे प्रबोधन करत असून आपण कुठल्याही धर्माच्या विरोधात नसून धर्माच्या नावावर सुरु असलेल्या बुवाबाजी विरोधात असल्याचे अनिसचे हरिश देशमुख यांनी बोलताना सांगितले.

पुढे देशमुख म्हणाले, 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती हिंदू धर्माच्या विरोधी असल्याची अफवा पसरवून लोकांच्या धार्मिक भावना दुखावण्याचे काम करण्यात येत आहे. त्यातून चिडलेले नागरिक आम्हाला आणि राज्यभरातील कार्यकर्त्यांना फोनद्वारे अश्लील शिवीगाळ करत आहेत. तसेच आमच्या अनेक पदाधिकाऱ्यांची सोशल मीडियावर बदनामी करण्यात येत आहे. मात्र तरी आम्ही सर्व संयमाने सर्वांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न



करत असून या धमक्यांमुळे आम्ही घाबरणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले'.

श्याम मानव यांच्या घरावर बॉम्ब टाकण्याची आणि नरेंद्र दाभोलकर यांच्याप्रमाणे गोळ्या घालून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या पुण्यातील तरूणाला अटक केल्यानंतर श्माम मानव यांच्या सुरक्षेत नागपूर पोलिसांनी वाढ केलीय. श्याम मानव यांना धमकी दिल्यानंतर बंदुकीसह पुण्यातील एक संशयिताला पोलिसांनी अटक केली आहे. या तरूणाच्या अटकेनंतर नागपूर पोलिसांनी अधिक खबरदारी घेतली असून पुण्यात श्याम मानव यांचा मुलगा राहत असलेल्या ठिकाणी देखील सुरक्षा वाढवली आहे.

धमक्या आल्यानंतर याबाबत श्याम मानव यांना विचारले असता ते म्हणाले, 'मला भीती वाटत नाही, दाभोळकर, पानसरे यांच्या हत्या झाल्यानंतर मी लगेच यामागे कोण आहे, हे कोणी केले आहे हे सर्व सांगितले होते. जे तरुण यामागे आहत ते सर्व ब्रेन वॉश केलेले तरुण असून यापूर्वीच्या चारही हत्या प्रकरणात पोलिसांना सुरुवातीपासून माहिती होती. मात्र पुरावे मिळत नव्हते. दोन दिवसांपूर्वी पुण्यात पकडली गेलेली व्यक्ती कोण आहे यासंदर्भात फारशी माहिती नाही. तो त्याच संघटनांच्या वर्तुळातला आहे की बाहेरचा आहे हे अजून स्पष्ट नाही. मात्र, हे अतिशय नियोजित पद्धतीने रचलेला कट असून त्यांना महाराष्ट्रात कोणीही पुरोगामी विचाराचा नसावा असे वाटत आहे. त्यामुळे जी मुलं हिंदू धर्मावर प्रेम करतात त्यांचा ब्रेन वॉश केला जातो.

त्यामुळे जे जे हिंदू धर्मात सुधारणांबद्दल काही करतात ते सर्व हिंदू धर्म विरोधी आहेत, ते सैतान आहेत असे त्यांच्या डोक्यात भरवले जाते. एका प्रकारे त्यांना प्रोग्राम केलं जातं. पुण्यात पकडला गेलेला माणूस त्याच यंत्रणेतून तयार झालेला आहे का? तो ब्रेनवॉश केलेला आहे का? त्याबद्दल पोलिस शोध घेतील आणि सत्य समोर आणतील. या सर्वा मागे सनातन प्रभात सारखे लोक असू शकतात, अशी शंका श्याम मानव यांनी व्यक्त केली आहे.

## आज आणि उद्या राज्यात पावसाचा अंदाज

**मुंबई** : राज्यात बहुतांश ठिकाणी थंडीचा जोर कायम आहे. मात्र, थंडी कमी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तसेच राज्यात आज आणि उद्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# 'बरं झालं महाराष्ट्राची सुटका होतेय'

## राज्यपालांच्या पत्रावर शरद पवारांची खोचक टीका!

**मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात आल्यापासूनच महापुरुषांवर वादग्रस्त वक्तव्ये करण्याची मालिकाच लावलेल्या राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून पदमुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. यामुळे राज्यामध्ये राज्यपाल बदलाची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. या मुद्यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोजक्या शब्दांमध्ये प्रतिक्रिया देताना खोचक टीका केली. ते आज कोल्हापूरमध्ये बोलत होते. कोश्यारी यांनी लिहिलेल्या पत्रावरून मोजक्या शब्दात टीका करताना राज्यपालांकडून महाराष्ट्राची सुटका होत आहे ही चांगली गोष्ट असल्याचे सांगितले.

दरम्यान, महाराष्ट्रामध्ये राज्यपाल कोण होणार याची चर्चा रंगली आहे. यामध्ये पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांच्या नावाची चर्चा रंगली आहे. मात्र, याबाबत अजून कोणतेही भाष्य करण्यात आलेलं नाही.

# पुण्यात तब्बल ६३ लाखांची गोवा बनावटीची दारू जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्काच्या तळेगाव दाभाडे विभागाने कारवाई केलेली आहे. पुणे-मुंबई महामार्गावर उर्से गावाच्या हद्दीत सापळा रचून पोलिसांनी ही गोवा बनावटीची दारु जप्त केली आहे. राज्य उत्पादन शुल्काने कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये ६२ लाख ६८ हजार रुपये किमतीची दारू जप्त केलेली आहे. या प्रकरणात दोन जणांना अटक करण्यात आली आहे. या मध्ये गामित सोमवेलभाई सिंगाभाई (वय २५वर्षे),व्यवसाय ट्रक चालक रा- ओटा ता. सोनगड जि. तापी गुजरात, मोहन दिनराम खथात वय ३४ वर्षे व्यवसाय- ट्रक क्लिनर रा- रुध्रपुरा ता. हुरडा जि. भिलवाडा, राजस्थान यांना अटक करण्यात आली आहे.

पुणे मुंबई द्रुतगती मार्गावर कंटेनर भरून मद्याचा साठा जप्त करण्यात आला. आंतरराज्य या टोळीचा राज्य उत्पादन शुल्काने हा पर्दाफाश केला. उर्से टोल नाक्यावर यासाठी शुक्रवारी सापळा रचला होता. त्यावेळी खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार अवजड वाहनांची तपासणी करण्यात आली. तेव्हा एका कंटेनरमध्ये आठशे बॉक्स आढळले. त्यात ४३ हजार दोनशे रॉयल ब्लु माल्टच्या बॉटल आढळल्या. गोवा राज्य निर्मित आणि फक्त गोवा राज्यात विक्रीकरता हा गोवा बनावट मद्यसाठा असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली. अटकेतील गामीत सिंगाभाई गुजरातचा तर मोहन खताथ हा राजस्थानमधील आहे. त्यामुळं या टोळीचा गोवा, गुजरात आणि महाराष्ट्र असं कनेक्शन असल्याचा उत्पादन शुल्क विभागाला संशय आहे.

पुण्यात अवैध दारु विक्री आणि अवैध दारु सेवन करणाऱ्या विरुद्ध विशेष मोहिम राबवली आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे ६८ आणि ८४ कलमानुसार अवैध मद्य विक्री करणाऱ्यांविरुद्ध तसेच अवैध ठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध जिल्ह्यात ७ ते ९ जानेवारी दरम्यान विशेष मोहिम राबवली होती. एकूण २९ जणांवर गुन्हा नोंदवण्यात आले आहेत, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे कार्यालयाने दिली होती. त्यानंतरदेखील कारवाईचा तडाखा सुरुच आहे.